'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 73 :
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
November-2018

Impact Factor – 6.261

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

## Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

November-2018 Special Issue – LXXIII

Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 500/-

Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 73 :
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
November-2018


| | | | |
|---|---|---|---|
| 91 | उर्दू माध्यमांच्या विद्यार्थ्यांना मराठी भाषेविषयी येणाऱ्या अडचणी व उपाय | नासीर गिरासे | 462 |
| 92 | मौखिक इतिहास | डॉ. संतोष दत्तात्रय बोडके | 465 |
| 93 | आदिवासी कोकणा भाषेचा एक शोध | प्रा. जयश्री रामदास बागुल (खरे) | 472 |
| 94 | सावरकरांचा राष्ट्रवाद | प्रा. संतोष शेलार | 477 |
| 95 | बाबुराव बागुलांच्या कवितेतील विविध जाणीवा | डॉ.देविदास खोडेवाड | 489 |
| 96 | अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरी लेखनातून अभिव्यक्त होणारा स्त्रीविषयक दृष्टीकोन | डॉ.दादाराव गुंडरे | 495 |
| 97 | प्रशासकीय सुधारणा आणि तंत्र | प्रा.हनमंत हेळबे | 500 |
| 98 | शौचालय व सामाजिक परिवर्तन | प्रा.आर. बी.काळे | 504 |
| 99 | नांदेड जिल्ह्यातील शेतीवर आधारित उद्योगधंदे : एक भौगोलिक अभ्यास | डॉ.यु.एस.कानवटे | 508 |
| 100 | आपत्ती व्यवस्थापन व प्रसार माध्यमे | डॉ. बालासाहेब मुंडे | 512 |
| 101 | दलित कवितेतील आई | प्रा.विलास पंडित | 516 |
| 102 | राजकारण व महिलांचे सक्षमीकरण – एक अभ्यास | विनोद डौले | 520 |
| 103 | जतन व संरक्षण : इफ्ला (IFLA) चे योगदान | श्री.नारायण फड | 524 |
| 104 | बारोमास-होरपळून निघणाऱ्या कृषिकेंद्रित जीवनाची करूण गाथा | डॉ.शकुंतला भारंबे | 529 |
| 105 | बखरकारांनी रेखाटलेली संभाजी राजांची अनैतिहासिक प्रतिमा | डॉ.डी.एस.बिराजदार | 533 |
| 106 | अमळनेर येथील प्रताप हायस्कूल मधील शिक्षक व विद्यार्थी यांचा भारतीय स्वतंत्र आंदोलनातील सहभागाचा इतिहास-एक अभ्यास | प्रा.किशोर पाटील | 537 |
| 107 | १९९० नंतरच्या प्रसिद्ध लेखकांच्या पत्नीचे आत्मचरित्रे | डॉ.एस.पी.पैकेकरी | 540 |
| 108 | संत कवयित्रिंचे वाङ्मयीन कार्य | डॉ. सदाशिव सरकटे | 544 |
| 109 | वाचनसंस्कृती – दिशा आणि दशा | डॉ. प्रतापराव गायकवाड | 548 |
| 110 | वृद्धांच्या समस्या – एक समाजशास्त्रीय चिंतन | प्रा. प्रदीप पाटील | 554 |
| 111 | मुस्लीम सत्यशोधक समाजाची वाटचाल (१९६६ ते आजपर्यंत) | प्रा. श्रीचंद चव्हाण | 558 |
| 112 | संत साहित्यमूल्यांचे समकालीन महत्त्व | प्रा. डॉ. धनराज ल. खानोरकर | 561 |
| 113 | क्रांतिनायक डॉ. बाबासाहेब आंबेडकर : काही निरीक्षणे | डॉ. सुरेश खोब्रागडे | 567 |
| 114 | नव्वदोत्तर समाज जीवन आणि स्थित्यंतरे | - डॉ. किशोर सोनवणे व दिनानाथ पाठक | 573 |
| 115 | निसर्गाचे लीळाचरित्र लिहिणारी ललित प्रतिभा- मारुती चितमपल्ली | प्रा. सचिन पाटील | 578 |
| 116 | परिवर्तनाच्या लढ्याला गतिमान आणि सशक्त बनविणारे विवेकी चिंतन! | डॉ.राजेश्वर दुडूकनाळे | 581 |
| 117 | नाशिक जिल्ह्यातील वैयक्तिक सत्याग्रह चळवळ | डॉ. संतोष दत्तात्रय बोडके | 588 |
| 118 | महाराष्ट्रातील जायकवाडी सिंचन प्रकल्पाचा इतिहास : एक अभ्यास | प्रा. प्रवीण चव्हाण | 594 |
| 119 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान | डॉ. महादेव मुंडे | 598 |
| 120 | शोषण करणाऱ्या नव्या व्यवस्थेचा शोध घेणारी अरुण काळे यांची कविता : 'नंतर आलेले लोक' | डॉ. शशिकांत पाटील | 602 |
| 121 | प्रसारमाध्यमांचे बदलते स्वरूप आणि जनमानस | प्रा. राजाराम झोडगे | 607 |
| 122 | मानसिक तणावात नाडीशुद्ध प्राणायामाचा परिणाम | कुणाल महाजन | 612 |
| 123 | सामाजिक पर्यावरण : काही निरीक्षणे | प्रा.अंबादास घुले | 616 |


Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 73 :
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
November-2018

# संत कवयत्रीचे वाङमयीन कार्य

डॉ. सरकटे सदाशिव
मराठी विभाग प्रमुख
कला व विज्ञान महाविद्यालय
शिवाजीनगर.गढी ता.गेवराई
9420029115
shsarkate@gmail.com

१३ ते १७ वे शतक अशी चारशे वर्षे संतानी आत्मानुभूतीतून जीवन शुध्दीचा वारकरी सन्मार्ग दाखवून सदाचार संस्काराने समाजातील असख्य लोकांना जगण्याची शक्ती दिली. संताचा मानव्याचा खजिना मराठी ओवी अभंगातून व्यक्त होतांना मराठी भाषेची आशय आणि अभिव्यक्तीची दालनं समृध्द केली संत वाङमयाने आध्यात्मिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक सांस्कृतिक क्षेत्रात आमुलाग्र परिवर्तन झाले. आज संतवाङमयातील विचार मानव्याचा शाश्वत ठेवा वाटतो.

संत वाङमयाचे अतिशय महत्वाचे वैशिष्टय म्हणजे या कालावधीत सामाजिक दृष्टया उपेक्षित असणाऱ्या दलित, स्त्री घटकाला ही आपल्या जीवन जाणिवेचा हुंकार व्यक्त करायला संधी मिळाली.भारतीय 'स्त्री' उपेक्षित असतांना संत वाटिकेत 'स्त्री' संतकवयत्रीना महत्वाचे स्थान मिळाले. 'स्त्री' ही पुरूषापेक्षा कमी नाही ती ही एक माणूस आहे. हा संदेश संत कवयत्रीच्या वाङमयाने प्रथमच दिला. मुक्ताबाई, जनाबाई, सोयराबाई, निर्मलाबाई, कान्होपात्रा, बहिणाबाई सारख्या समाजाने उपेक्षित ठरविलेल्या स्त्रीयांनी आपल्या जीवन वाङमय कार्याने आपली ओळख निर्माण करून संतत्व पदास पोहचल्या. या संत कवयत्रीचे मराठी साहित्यात महत्वपूर्ण योगदान आहे. या संत कवयत्रीचे विशेष म्हणजे यांना संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत चोखामेळा, संत तुकारामसारख्या महान संताचा सहवास लाभला. एवढेच नव्हे तर या महान संताच्या जीवन कार्यात या संत कवयत्रीचा मोठा वाटा आहे हे कोणीही नाकारू नये. वाङमयीन दृष्टया विचार करता या प्रत्येक संत कवयत्रीने मराठी साहित्याला मोठे योगदान दिलेले दिसते.

संत ज्ञानेश्वराची धाकटी बहिण मुक्ताबाई ज्ञानेश्वराप्रमाणे योगिनी होती. ती सर्व भावडांत लहान असली तरी तिची समज आणि ज्ञानसंपन्नता फार मोठी होती. जगाला सन्मार्ग दाखविणाऱ्या संत ज्ञानेश्वराना ही सावरण्याचे काम मुक्ताबाईने केले. ते ताटीच्या अंभगात भावस्पर्शी रूपात असलेले दिसते. शिवाय चांगदेवासारख्या हट योगी पुरूषासोबत या पंधरावर्षाच्या पोरीने योगिक संवाद साधून आपल्या ज्ञान संपन्नतेने शिष्य बनविले. या संवादातले कुट अभंग सामान्य माणसाच्या आकलना पलिकडचे आहे. संत ज्ञानेश्वर आणि चार भावडांची संन्याशाची मुले म्हणून अवहेलना होतांना दुःखी निराश झालेल्या ज्ञानेश्वराला ताटी उघडण्याची गळ घालतांना स्वतःच्या वेदना दाबून आपल्या भावाला समजविण्यासाठी प्रकट झालेला आत्माविष्कार अखिल मानवजातीसाठी मार्गदर्शक आहे. ताटीच्या अभंगातील भावार्थ तिची जीवनाकडे पाहण्याची समदृष्टी, उपदेशाची शब्दकळा वाङमयीन शक्तीचे सामर्थ्य आहे.

मजवरी दया करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा
संत जेणे व्हावे । जग बोलणे सोसावे.

या अंभगातील चा भांवडांची व्यस्था वेदना दुःख भोगानंतरही स्वतःला सावरून कर्तव्य भावनेने सामान्य माणसासाठी कार्य करण्याची संतत्ववृत्ती समाजाला आणि साहित्याला शक्ती देणारी ठरली. मुक्ताबाईचे ४२ अंभग उपलब्ध आहे.

Scanned with CamScanner

पंधरा वर्षाच्या मुक्ताबाईने पासष्ट वर्षाच्या वयोवृध्द चांगदेवाशी योगमार्गाविषयी साधलेला संवाद 'कुट अभंगात आला असून या अभंगातून मुक्ताबाईचे योग सामर्थ आणि ज्ञान संपन्नता जाणवते. या अभंगातील आशय अभिव्यक्ती मराठी साहित्याला समृध्द करणारी आहे. त्यांचे मुंगी उडाली आकाशी, जीव जंतू जड त्यासी, निर्गुणाची शेज, सगुणाची बाज सारखे अभंग वैशिष्टयपूर्ण आहेत त्यांचा

'मुंगी उडाली आकाशी । तिने गिळिले सूर्याशी ।'

हा अभंग वाचतांना त्यातील अलौकिकत्व जाणवते हया अभंगातील प्रतिके मुंगी, वांझ स्त्री, विंचू, माशी ही जीव सृष्टीतली वरवर वाटणारी रूपे पंचमहाभूती अद्वैत तत्वज्ञानात विशाल रूपात दिसतात. ती मुंगी राहत नाही तर पंचमहाभूती शक्तीचे अंग ठरते त्यातून जीव सृष्टीचे एकात्म भावते. ही जीवन जाणीव मराठीला व्यापकतेचे परिमाण देणारी आहे. या अभंगातील गूढता, विस्मय, कुतूहल आत्मिक अनुभूतीचा प्रत्यय देणारी चमत्कृती आहे. मुक्ताबाईची प्रतिभा, कल्पना आणि चमत्कृती मराठी वाङमयाचे सामर्थ्य ठरले आहे.

मुक्ताबाई प्रमाणे नामयाच्या जनीला संतवाङमयात वैशिष्टयपूर्ण स्थान आहे. संतवाङमयात जनाबाईला 'संत वाटिकेतील जाईची वेल' १ म्हटले आहे जनाबाईच्या नावावर जवळपास ३५० अभंग सकलसंत गाथेत पहावयास मिळतात. जनाबाईचे अभंग मनाचा ठाव घेणारे असून ''स्त्री मनाचा कोमल भाव आणि भक्तीतील उत्कटतेमुळे जनाबाईचे अभंग भावगीतासारखे वाटतात. २'' जनाबाई पोरकी झाल्याने लहान पणापासून संत नामदेवाच्या घरात सेवाचा करी करीत घडली. विठठलाची भक्ती करतांना श्रमात भक्तीपाहून आपल्या मनातील उत्कट भाव अभंग झाले. या अभंगाला संतत्वाचे रूप आल्याने आत्मनिवेदन पर अभंगाबरोबर संत नामदेवाचे चरित्र समष्टीचा भाव प्रकट करणारे ठरले. एकस्त्री म्हणून 'स्त्री' जीवन आणि भावसंवेदना प्रतिनिधिक स्वरूपात त्यांच्या अभंगात आल्या आहेत. 'स्त्री' जातीमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचे फार मोठे कार्य जनाबाईने केले. 'वारकरी संत साहित्यात स्त्री आणि दासांचा पहिला स्फुलिंग जनाबाईच्या अभंगात दिसतो.' ३

'स्त्री जन्म म्हणवूनी न व्हावे उदास' या अभंगात तत्कालीन काळातील स्त्री ची अवहेलना मांडतांना स्त्रियांमध्ये आत्मविश्वास आणि निभर्यता निर्माण केलेला दिसतो. हा अभंग आजही स्त्रियासाठी प्रेरणादायी असून समाजाला मानव्याचे भान देणारा आहे.

जनाबाईच्या अभंगातही जीवनसृष्टीचे एकात्म आहे. माता आणि मुलांमधील वात्सल्यभाव जीवसृष्टीला कवेत घेणारा आहे. जनाबाईच्या पक्षी जाय दिगंबरामधील पक्षी, घार, वानरामधील मातामुलामधील वात्सल्यभाव अद्वैतवादाचा प्रत्यय देणारा आहे. साध्या सोप्या शब्दातून आपल्या मनातील उत्कट भाव प्रकट करणाऱ्या अभंगाने मराठी वाङमयाची उंची वाढविली आहे.

संत सोयराबाई चोखा मेळा सारख्या महान संताची पत्नी असून निर्मळा बहिण आहे. संत चोखामेळाच्या कुटुंबात सर्व संत होते या सर्व संताच्या अभंगात शुध्दभक्ती आणि शुदत्वाची सामाजिक विषमतेची खंत मनाला चटका लावणारी आहे. विठठलाच्या दरबारात आपली दालित्याची व्यथा प्रकट करणारा चोखामेळाचा अभंग दलितवेदनेचा पहिला हुंकार आहे. चोखामेळाच्या अभंगाप्रमाणे सोयरा, निर्मळा आणि कर्ममेळाच्या अभंगात जीवन जाणिवेचा समृध्द अविष्कार आहे. सोयराबाईच्या अभंगात भावभक्ती बरोबर भवसागरातील जीवन सत्यता प्रकट झाली ओहे.

अवघे सुखाचे सांगाती । दु:ख होता पळती आपोआप
भार्या पुत्र भगिनी मातीयता । हे सर्व सर्वधा सुखाचे सांगाती

Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 73 :
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
November-2018

अशा शब्दात सोयराबाईने संसार जीवनातील वास्तवाबरोबर सत्य मांडले आहे. सोयराबाईचे जीवनमर्म उलगडून दाखविणारे शाश्वत सत्य सांगणारे अभंग वाङ्मयाला चिरतंन मूल्ये देणारे आहे. मोह माया संसार जाळात गुरफटून न जाता जीवनाची सार्थकता साधण्यासाठी माणूसपण जपण्याचा सल्ला देतात. सोयराबाईने कर्म करीत जीवन मूल्यांची पेरणी आपल्या अभंगातून केलेली दिसते. आपल्या अभंग वाङ्मयातून प्रबोधनाचे कार्यही सोयराबाईने केलेले दिसते. सोबतच सामाजिक पातळीवरची जाती विटाळ अस्पृश्यता या माणूसहीन संकल्पनेचा फोलपणाही त्यांना स्पष्ट केला.

देहीचा विटाळ देहीच जन्मला
सोवळा तो झाला कवण धर्म
विटाळा वाचोनी उत्पत्तीचे स्थान
कोण देह निर्माण नाही जगी

अशा शब्दात विटाळाचा फोलपणा प्रकट करतांना माणसाला समाजतेची जाणीव करून दिली प्रत्येकाचा जन्म विटाळातूनच झाला असून विटाळ हा देहाचा अविभाज्य भाग आहे जीवनात मनाची शुध्दता महत्वाची असून निर्मळ अंतकरणाने सत्कर्म करून जीवनाचे सार्थक करा असा मराठी माणसाला व मराठी साहित्याला वैज्ञानिक दृष्टिकोन दिला.

सोयराबाई प्रमाणे निर्मळानेही भक्ती बरोबर प्रबोधनातून परमार्थ साधला. शुध्द भक्ती भाव हाच जीवणाचा स्थायी भाव असेल तर कोणी उचनाही कोणी नीच नाही. आपण समान आहोत. जातीचा विटाळ मानण्यापेक्षा परद्रव्य, परान्न, परस्त्रीचा विटाळ मानण्याचा उदबोधक विचार निर्मळाबाई मांडते. संसारात गुटफटून न जाता जीवनाचे मर्म जाणा, माणूस म्हणून जगा ! जीवनाच्या आनंदासाठी चित्तशुध्दीचा मूलमंत्र निर्मळाबाई देतात. जीवनाचे सार्थक आपल्या शुध्द आचरणात असून सत्य शिव सौदर्याने सामाजिक आणि वैयक्तिक जीवनात आनंद मिळतो ही वाङ्मयाची मूल्ये त्यांनी आपल्या अभंगात मांडली.

एका वेश्येच्या घरात जन्मलेली कान्होपात्रा आपल्या आंतरिक भावभक्तीने संत कवयत्री ठरली. मानवी मूल्ये आणि जीवनमूल्यांचा आविष्कार त्यांच्या अभंगातून भाषोत्कटपणे प्रकट झाला आहे. कान्होपात्राचे सकल संत गाथेत तेवीस अभंग प्रसिध्द आहे ''त्यातील करूण भाव आणि भावोत्कटता मनाला पाझर फोडणारी आहे.'' ४ विठ्ठल भेटीसाठी आतुर झालेली कान्होपात्रा मानवी विकारी भावनेवर भाष्य करतांना समाजांना सन्मार्ग दाखविते. वासनेमुळे देव राजा महाराजांचा कसा विनाश झाला हे सांगत मानव्याचे दर्शन घडवितो. कान्होपात्राच्या अभंगाने मराठी साहित्यात वेगळया अनुभवातून जीवनाची प्रगल्भता व्यक्त होतांना एक सामर्थ्य प्राप्त झालेले दिसते.

संत वाटेवरची बहिणाबाईचे तुकारामाचे सानिध्य लाभलेली विरक्त संत कवयत्री होय. संसारात न गुरफटता विठ्ठल भक्तीत तल्लीन होवून जीवन संसारातील चांगल्या वाईट बाबीवर भाष्य करून जीवन सत्य सांगणाऱ्या बहिणाबाईने मराठी वाङ्मयात मोलाची भर टाकली आहे. वारकरी संप्रदायाच्या वाटचालीचा इतिहास सांगणारा बहिणाबाईचा अभंग प्रत्येक वारकऱ्याच्या मुखात आहे. 'संत कृपा झाली इमारत फळा आली' या अभंगाबरोबर जवळपास चारशे अभंग बहिणाबाईचे प्रसिध्द आहे. त्यात ७४ अभंग आत्मचरित्रात्मक असून संत तुकारामाच्या भेटीनंतर बहिणाबाईच्या जीवन अभंगाला मानण्याचा सुंगध आला आहे. भाव भक्तीत स्थीर होतांना त्यांचे अभंग संसार जीवनातील वास्तव आणि कर्माचे भान देतात.एकूणच सर्व संत कवयत्रिच्या अभंगाचा विचार करता असे जाणवते की एक स्त्री म्हणून त्यांनी आपले श्रेष्ठत्व सिद्ध केले असून स्त्रीपुरूष भेद नष्ट केला स्त्री मनातील मानवी मूल्ये आणि जीव सृष्टीतील तादात्म्यता मराठी मनामनाला जोडणारी असून साहित्याला व्यापक अनुभूतीचे भावविश्व आणि मांडण्याची शैली यामुळे मराठी साहित्य अनुभव आशयाने समृध्द झाले असून शैलीने प्रगस्थ झालेले दिसते. मराठी साहित्य जोपर्यंत आहे तोपर्यंत या संतकवयत्रीचे अभंग भावी पिढयांना प्रेरणा दायी ठरणारा वाङ्मयीन ठेवा आहे.

Scanned with CamScanner

**निष्कर्ष -**

१. संत साहित्याने सामान्य माणसांना आत्मशक्ती सदाचाराची जीवनशक्ती दिली.
२. मुक्ताबाईचे अभंग जीवसृष्टीची तादात्म्यता प्रकट करणारे असून त्यातुन मानवी एकात्मता साधता येते.
३. जनाबाईचे अभंग स्त्री मना आणि दासांचा पहिला हुंकार असून तिने स्त्री मध्ये आत्मविश्वास निर्माण करून निर्भय बनविण्याचे
४. महान कार्य केले.
५. सोयराबाईचे अभंग जीवन जाणिवेचा समृध्द अविष्कार असून भवसागरातील जीवन सत्वता आजही उदबोधक आहे.
६. सोयराबाईच्या अभंगात शाश्वत सत्याबरोबर वैज्ञानिक दृष्टिकोन दिसतो.
७. उचनीचतेच्या विटाळापेक्षा परद्रव्य, परान्न, परस्त्रीचा विटाळ माना असे सांगणारी सोयराबाई खरोखर संत आहे.
८. कान्होपात्राचा अभंग म्हणजे विकारी भावनेवरचे औषध आहे.
९. संत कवयत्रीचे अनुभूतीचे भावविश्व आणि उत्कट अभिव्यक्ती मराठी साहित्याला समृध्द करणारी आहे.

**संदर्भ -**

१. नसिराबादकर ल.रा., 'प्राचीन वाङ्मयाचा इतिहास,' फडकेप्रकाश कोल्हापूर १९९१ पृ.क्र.७४
२. डॉ. इंगळे रामदास, संत बोलती वचन, नभप्रकाशन, अमरावती. २०१५ पृ.क्र. ४९
३. तत्रैव ५०
४. तत्रैव ६२
५. ढेरे. रा.चि. सकलसंत गाथा खंड १,२,३,४,५ वरदा बुक पुणे १९९३

Scanned with CamScanner